# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

## 1. मंडळाची स्थापना :

माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचा इतिहास लक्षात घेतला असता, आपणांस 1922 सालापर्यन्त मागे जावे लागेल. 1922 साली सेंट्रल प्राव्हिन्सेस ॲन्ड बेरार हायस्कूल ऐज्युकेशन ॲक्ट अन्वये पहिले प्रथमच परीक्षा मंडळ स्थापन झाले होते. यावेळी परीक्षस केवळ 3000 विदयार्थी होते. यानंतर 1951 साली एम.पी.एज्युकेशन ॲक्ट पास होऊन त्या अन्वये माध्यमिक शालांत मंडळाला स्वायत्त मंडळाचा दर्जा देण्यात आला. या मंडळाने 1953 पासून माध्यमिक शालांत परीक्षा घेण्यास सुरुवात केली. यावेळी माध्यमिक शालांत परीक्षेस बसणा-या विदयार्थ्यांची संख्या 15000 होती.

राज्य पूर्नरचनेच्या वेळी 1956 मध्ये मध्यप्रदेश व विदर्भ या 2 विभागासाठी मध्यप्रदेश स्टेटयूटरी बोर्ड ॲक्ट 1956 अन्वये विदर्भासाठी एक स्वतंत्र व महाकोशल विभागासाठी दूसरे स्वतंत्र बोर्ड माध्यमिक शालांत परीक्षा घेण्यासाठी निर्माण करण्यात आले. त्यावेळी या मंडळाचे विदर्भ बोर्ड ऑफ सेंकडरी एज्यूकेशन, नागपूर असे नामानिधान करण्यात आले.त्यावेळी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस बसणा-या विदयार्थ्यांची संख्या सुमारे 23,000 होती.

यानंतर महाराष्ट्र सेकंडरी ॲन्ड हायर सेकंडरी एज्युकेशन बोर्डस् ॲक्ट 1965 अन्वये पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या 3 विभागीय मंडळाची केवळ माध्यमिक शालांत परीक्षा घेण्यासाठी रचना करण्यात आली आणि राज्य मंडळाकडे इयत्ता 8 ते10 वी पर्यन्तचा अभ्यासक्रम ठरविणे, पाठयपुस्तके तयार करणे, तिन्ही विभागीय मंडळामध्ये समन्वय साधणे इत्यादी काम देण्यात आली. राज्य मंडळ व तिन्ही विभागीय मंडळे यांचे कामकाज 1 जानेवारी 1966 पासून सुरु झाले.

यावेळी नागपूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रात अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली व वर्धा असे 9 जिल्हे होते.

1972 पासून महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सुधारित अभ्यासक्रम अंमलात आणला. 1975 साली 3 विभागीय मंडळाची परीक्षा समान अभ्यासक्रमानुसार व पाठयपुस्तकावर आधारित अशी पहिल्या प्रथमच घेण्यात आली. त्यानंतर 1977 साली 10+2+3 शिक्षण प्रणालीनुसार उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा देखील घेण्याचे कार्य याच विभागीय मंडळाकडे सोपविल्यामुळे ही परीक्षा देखील समान अभ्यासक्रमावर आधारित अशी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच प्रश्नपत्रिकेने घेण्यात आली.

विदयार्थ्यांची वाढणारी संख्या पाहता महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 1981 साली नागपूर विभागीय मंडळाचे उपकार्यालय, अमरावती येथे सुरु करण्यात आले.

सन 1991 ला अमरावती उपकार्यालयाला स्वतंत्र विभागीय मंडळाचा दर्जा देण्यात आला व या विभागीय मंडळास अमरावती,अकोला,बुलढाणा व यवतमाळ हे चार जिल्हे जोडण्यात आले.
नागपूर विभागीय मंडळाच्या कक्षेत आता नागपूर,वर्धा,भंडारा,चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया असा सहा जिल्हयांचा समावेश आहे.